फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५१ अन्वये आरोपीस सांगावयाचा अपराधाचा तपशील

दोंडाईचा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात

सं.फौ.ख.क्र.२३१/२०२२

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | – | ११.०१.२०२२ |
| २. तक्रार दाखल केल्याचा दिनांक | – | ११.०१.२०२२ |
| ३. फिर्यादीचे नांव व पत्ता | – | महाराष्ट्र शासन<br>मार्फत – दोंडाईचा पोलीस स्टेशन. |
| ४. आरोपीचे नांव व पत्ता | – | नावेदशाह कलीमशाह,<br>वय – २२ वर्षे, व्यवसाय – अंडापाव गाडी,<br>रा. चैनीरोड, दोंडाईचा,<br>ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

गुन्ह्याचा तपशील –

दिनांक ११.०१.२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वाजेच्या सुमारास, दोडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, सार्वजनीक ठिकाणी तुम्ही अंडापाव गाडी लावुन जास्त लोकांना बसवुन जे की रोगाचा संसर्ग पसरविण्याचा संभव असुन ते माहीती असतांना देखील सदर गाडीवर लोकांची गर्दी करुन बेकायदेशीर व हायगीचे कृत्य करतांना मिळुन आले म्हणून तुम्ही भारतीय दंड संहिता कलम २६९ अन्वये शिक्षेस पात्र आणि या न्यायालयाच्या दखलगीतील गुन्हा केला आहे.

आरोपीचे निवेदन –

प्रश्न क्र.१ तुम्हांस कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या काय ?
उत्तर – होय.
प्रश्न क्र.२ तुम्हांस अपराधाचा तपशील समजला काय ?
उत्तर – होय.
प्रश्न क्र.३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – होय, मला गुन्हा कबुल आहे.

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-
आरोपीची सही / अंगठा

समक्ष,
सही/–

( अविनाश डब्ल्यु क्षिरसागर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

दिनांक – १३.०८.२०२२

## आदेश नि. क्र. १ वरील

आरोपीस गुन्ह्याचा तपशील वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल केला. आरोपीने अंडापाव गाडी लावुन जास्त लोकांना बसवुन जे की रोगाचा संसर्ग पसरविण्याचा संभव असुन ते माहीती असतांना देखील सदर गाडीवर लोकांची गर्दी करुन स्वतःच्या व समाजातील इतर लोकांच्या जिवीताला गंभीर धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आरोपीने गुन्हा कबूल असल्याचा न्यायालयासमोर मान्य केले आहे. आरोपीला गुन्ह्यात होणारी शिक्षा व शिक्षेचे स्वरुप समजावून सांगितले. आरोपीने कोणाच्याही दबावाखाली येऊन गुन्हा कबूल करीत नाही असे सांगितले. आरोपी स्वतःहून गुन्हा कबूल करीत आहे अशी माझी खात्री झाली आहे.

आरोपीने या प्रकरणी त्याचा हा पहिलाच गुन्हा असून त्याची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे असे सांगून कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली. गुन्ह्याचे स्वरुप आणि आरोपीच्या विनंतीचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

आरोपी नावेदशाह कलीमशाह यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय दंड संहिता कलम २६९ अन्वयेचा भंग केल्याबद्दल दोषी धरण्यात आले आहे. सदर कायद्याचे दंडात्मक कलम २६९ अन्वये रक्कम रुपये २००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) दंड व न्यायालय उठेपर्यंत शिक्षा तसेच दंड न भरल्यास दोन दिवसांची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVINASH WAMANRAO KSHIRSAGAR
Date: 2022.08.13 20:13:39 +0530

( अविनाश डब्ल्यु क्षिरसागर )

दिनांक – १३.०८.२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

<u>प्रमाणपत्र</u>

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | - | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | १३.०८.२०२२ |

स्वाक्षरित/-
लघुलेखक.